# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निर्णयानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेअंतर्गत व मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिलांसाठी एक दिवसीय कार्यशाळा संपन्न**

शहरातील महिलांना रोजगार व त्यांची सक्षमता वाढावी यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या निर्णयानुसार "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण" ही योजना राबवण्यात येत आहे. मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या निर्णयानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेअंतर्गत पात्र महिला लाभार्त्याना सदर योजनेचा लाभ मिळवुन देण्यासाठी वापरावयाची कार्यपध्दती याबाबत प्रशिक्षण देण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभाग व बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 10 जुलै 2024 रोजी महानगरपालिकेत कार्यरत आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शहरातील बचत गट महिला पदाधिकारी, स्वयं सेवी महिला व मनपा कर्मचा-यांकरीता एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेस उपायुक्त (महिला व बालकल्याण) कल्पिता पिंपळे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी वेंकट हुंडेकर, महिला व बालकल्याण अधिकारी चारुशिला खरपडे, सहाय्यक आयुक्त तथा नोडल अधिकारी, महापालिका अधिकारी, कर्मचारी व महिला उपस्थित होत्या.

सदर कार्यशाळेमध्ये योजनेचे स्वरूप, योजनेचे लाभार्थी, पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अपात्रता व अर्ज करण्याची पद्धत याबाबतचे प्रशिक्षण व माहिती देण्यात आली. कार्यशाळेत 300 हून अधिक आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शहरातील बचत गट महिला पदाधिकारी, स्वयं सेवी महिला व महिला उपस्थित होत्या. कार्यशाळेच्या समारोपास मा. आयुक्त यांनी योजनेसाठी पात्र/अपात्र महिला याबाबत प्रश्नोत्तराच्या स्वरुपात महिलांशी संवाद साधला. महानगरपालिका क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ हा पात्र महिला लाभार्थ्यांपर्यंत सुलभरितीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालय क्र. 01 ते 06 मध्ये प्रभाग अधिकारी यांची समन्वय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या अधिपत्याखाली त्यांच्या कार्यालयात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेच्या अर्जाची नोंदणी करण्यासाठी "मदत/नोंदणी कक्ष" सुरु करण्यात आलेले आहे. सदर योजनेचे offline अर्ज / form व Narishakti Doot App वरून online अर्ज / form या कक्षामार्फत स्विकारले जातील. तसेच ऑनलाईन अर्ज भरणेस पात्र महिला लाभार्थ्यांना तात्काळ सहाय्य केले जाईल. सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता आवश्यक असलेल्या माहितीसाठी वरील नोडल अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. तरी मिरा भाईंदर शहरातील महिलांनी या योजनेचा पूर्णपणे लाभ घ्यावा असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले आहे.